RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ८, अंक ८६] शुक्रवार, सप्टेंबर ३०, २०२२/आश्विन ८, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १७८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० सप्टेंबर २०२२

### अधिसूचना

**प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगांस प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, २००९.**

क्रमांक संकिर्ण-२०२०/प्र.क्र.५३/पदुम-४.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाची शासन अधिसूचना क्र. संकिर्ण-२०२०/प्र.क्र.५३/पदुम-४, दिनांक ८ सप्टेंबर २०२२ (यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा केलेला आहे) अन्वये गुरे व म्हशींमधील लम्पी चर्मरोग, जो की प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगांस प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, २००९ (२००९ चा २७) (यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केलेला आहे) अन्वये अनुसूचित रोग म्हणून घोषित केलेला असून, त्यासाठी संपूर्ण राज्याचे क्षेत्र " नियंत्रित क्षेत्र " म्हणून घोषित करण्यात आलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभाग, मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय मंत्रालय, भारत सरकार यांनी अर्धशासकीय पत्र क्रमांक के-११०५३/६९/२०१९-एलएच, दिनांक २२ सप्टेंबर २०२२ द्वारे निर्देशित केले आहे की, म्हशींमध्ये लम्पी चर्म रोगाची सौम्य लक्षणे असून त्याची तीव्रता अत्यल्प आहे तसेच, आतापर्यंत कोणत्याही मृत्यूची नोंद झालेली नाही ;

आणि ज्याअर्थी, भारत सरकारने म्हशींच्या हालचालींना खालील अटींच्या अधीन राहून परवानगी दिली जाऊ शकते, असे निर्देशित केलेले आहे, म्हणजेच :—

(अ) संक्रमणाचा प्रसार रोखण्यासाठी राज्यभरातील बाधित क्षेत्रातून (एपी-सेंटरपासून ०१ कि.मी.च्या आत) म्हशींच्या हालचालींवर निर्णायकपणे लक्ष ठेवणे आवश्यक आहे ;

(ब) म्हशींची नियमित आरोग्य प्रमाणपत्रासह संक्रमित नसलेल्या क्षेत्रातून (घोषित एपि-सेंटर व्यतिरिक्तचे क्षेत्र) वाहतूक केली जाऊ शकते. आरोग्य प्रमाणपत्र जारी करण्यासाठी प्राधिकरण राज्य शासन वेगळ्या शासकीय आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करेल ;

(क) प्रादुर्भावग्रस्त क्षेत्रातील म्हशींची पशुवैद्यकामार्फत तपासणी करावी आणि नैदानिक लक्षणे असलेल्या कोणत्याही प्राण्याला जरी सौम्य लक्षणे दिसली तरीही त्यांना हालचाल करण्यास परवानगी देऊ नये, तसेच, वाहतूक करण्यापूर्वी सोबत उक्त (ब) येथे नमूद प्राधिकरणाचे अलिकडील आरोग्य प्रमाणपत्र असावे आणि शक्यतो वाहतुकीपूर्वी PCR चाचणी करून घ्यावी जिचा अहवाल नकारार्थी असावा.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाची कलमे ६ व ७ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, उक्त अधिसूचनेत पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

" उक्त अधिसूचनेच्या परिच्छेद (अ) मध्ये, " व म्हशी " हा मजकूर भारत सरकारच्या अर्धशासकीय पत्र क्रमांक के-११०५३/६९/२०१९-एलएच, दिनांक २२ सप्टेंबर २०२२ मधील नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून वगळण्यात येईल ".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**जगदीश गुप्ता,**
शासनाचे प्रधान सचिव.

## AGRICULTURE, ANIMAL HUSBANDRY, DAIRY DEVELOPMENT AND FISHERIES DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 30th September 2022.

*NOTIFICATION*

PREVENTION AND CONTROL OF INFECTIOUS AND CONTAGIOUS DISEASES IN ANIMALS ACT, 2009.

No. SANKIRNA-2020/C.R.53/ADF-4.—Whereas, the Government of Maharashtra has *vide* Government Notification, Agriculture, Animal Husbandry, Dairy Development and Fisheries Department No. SANKIRNA-2020/C.R.53/ADF-4, dated the 8th September 2022 (herein after referred to as "the said notification "), declared the whole State of Maharashtra as the "*Controlled Area*" in respect of the Lumpy Skin Disease (LSD), which is a Scheduled Disease declared under the Prevention and Control of Infectious and Contagious Diseases in Animals Act, 2009 (27 of 2009) (herein after referred to as the said Act), for cattle and buffaloes ;

And whereas, the Department of Animal Husbandry and Dairying, Ministry of Fisheries, Animal Husbandry and Dairy, Government of India *vide* D.O. No. K-11053/69/2019-LH, dated 22nd September 2022, had directed that the effect of Lumpy Skin Disease in buffaloes is very minimal with less severe symptoms and no deaths reported so far ;

And whereas, the Government of India had directed that the movement of buffaloes may be allowed subject to following conditions, namely :—

(*a*) movement of buffaloes from affected areas (within 01 Km. from the epi-centre) across the State has to be crucially monitored to prevent spread of infection ;

(*b*) buffaloes may be transported from non-infected areas (area other than declared epi-centre) with routine health certificate. Authority to issue health certificate will be as specified by State Government by separate Government Order ;

(*c*) buffaloes from the infected areas should be inspected for clinical signs by a veterinarian, and *no animal with clinical sign should be allowed for movement, even if mild symptoms are noticed,* accompanied by a recent health certificate of the authority as mentioned (b) and preferably be tested negative by PCR, before transportation.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sections 6 and 7 of the said Act, the Government of Maharashtra hereby amends the said notification as follows,—

" In paragraph (a) of the said notification, the words "and buffaloes" shall be deleted " subject to Government of India's above mentioned conditions specified *vide* Government of India D.O. No. K-11053/69/2019-LH, dated 22nd September 2022.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

JAGDISH GUPTA,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.